पुढारी

# विद्यापीठात आज क्रीडा वसतिगृह इमारतीचे भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नव्याने उभारण्यात येत असलेल्या 'क्रीडा वसतीगृह' इमारतीचे भूमिपूजन सोमवार (दि.१२) रोजी सकाळी ११ वाजता पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्याहस्ते होणार आहे. कार्यक्रमास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

12 FEB 2024

सकाळ

# पणदूरकर अभ्यासिकेचे उद्या भूमिपूजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कमवा आणि शिका मुलींचे वसतिगृह परिसरात डॉ. अॅड. रूपाली पणदूरकर अभ्यासिका नव्याने उभारली जाणार आहे. या अभ्यासिकेच्या इमारतीचे भूमीपूजन मंगळवारी (ता. १३) सायंकाळी पाच वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी हेमकिरण आणि प्रा. रामचंद्र पणदूरकर प्रमुख उपस्थित असणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठामध्ये उद्यापासून तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामध्ये दि. १३ ते १५ फेब्रुवारीदरम्यान 'इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड सस्टेनेबल डेव्हल्पमेंट' विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे.

वेबिनारचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. वेबिनारमध्ये ग्रीस सरकार ग्रीसचे शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाऊ, ॲरो संशोधन फाऊंडेशन, न्यूझीलंडचे डॉ. सीहम कफाफी, आदविक हायटेक पुणेचे अशोक



नलावडे मार्गदर्शन करणार आहेत.

याबरोबरच इलेक्ट्रॉनिक वेस्ट अँड मॅनेजमेंट केंद्राचे उद्घाटन इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामध्ये दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजता होणार आहे. वेबिनारचे समन्वयक म्हणून डॉ. एम. के. भानारकर, अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी. के. गायकवाड, डॉ. एस. ए. शिंदे, डॉ. पी. ए. कदम, डॉ. एस. एम. मस्के, एम. के. पांढरे व विभागातील परिश्रम घेत आहेत.

जनसंपर्क कक्ष
12 FEB 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश निरीक्षणाला उत्साही प्रतिसाद

**पन्हाळा : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्रामध्ये शुक्रवारी रात्री आयोजित आकाश निरीक्षण उपक्रमाला जिज्ञासू नागरिक, विद्यार्थी यांचा उत्साही प्रतिसाद लाभला. अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी उपस्थितांना खगोलीय माहिती दिली.

निरीक्षणावेळी उपस्थितांना १२ इंची दुर्बिणीच्या साहय्याने गुरू ग्रह आणि त्याचे उपग्रह पाहता आले. त्याचबरोबर विविध नेब्युला दाखवण्यात आले. ज्यामध्ये आकाशातील धूळ आणि हायड्रोजन वायू मोठ्या प्रमाणात असतात आणि त्यापासून नवीन ताऱ्यांची निर्मिती होत असते. विविध प्रकारचे तारका समूह, आकाशगंगा यांचे दुर्बिणीच्या साहाय्याने निरीक्षण करण्यात आले. कार्यक्रमास विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान आणि गणित विभागाचे विद्यार्थी, टेक्नॉलॉजी विभागातील शिक्षकांनी उपस्थिती लावली.

तसेच, कोल्हापूर, पन्हाळा, पेठवडगाव आणि जवळपासच्या परिसरातून नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेतला.



**पन्हाळा : पन्हाळगडावरून निरीक्षणप्रसंगी अवकाश संशोधन खगोलप्रेमी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2024
पुढारी

# क्रीडा क्षेत्रात भरारीची भारताला मोठी संधी : शारदा उग्रा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


भारताला क्रीडा क्षेत्रात मोठी संधी आहे. येथील खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता आहे. क्रीडा क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप कमी झाल्यास भारताचे या क्षेत्रातील भवितव्य उज्ज्वल आहे, असे मत ख्यातनाम क्रीडा पत्रकार शारदा उग्रा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित 'क्रीडा पत्रकारिता' या विषयावर त्या बोलत होत्या.

शारदा उग्रा म्हणाल्या, केवळ क्रिकेट म्हणजे संपूर्ण क्रीडा विश्व नाही. इतर खेळांकडेही खास लक्ष पुरविले पाहिजे. खेळाडूंना उत्तम सुविधा दिल्या पाहिजेत. संघटनात्मक पातळीवरील निर्णयात पारदर्शकता आल्यास भारतीय क्रीडा क्षेत्राला अजून चांगले दिवस येतील. यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी.

महिला पत्रकारांनी या क्षेत्राकडे सुरक्षित आणि चांगल्या करिअरची संधी म्हणून पाहावे. क्रीडा बातमी लिहीत असताना संतुलन आवश्यक आहे. इतरांपेक्षा वेगळी माहिती मिळवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

मास कम्युनिकेशनचे समन्वयक




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात क्रीडा पत्रकारिता विषयावर बोलताना शारदा उग्रा.**

डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. स्वागत डॉ. सुमेधा साळुंखे आणि डॉ. प्रसाद ठाकूर यांनी केले. परिचय साईसिमरन घाशी हिने करून दिला. सूत्रसंचालन मेघा मोहिते हिने केले. आभार मेलिना कालीचूर्ण हिने मानले.

यावेळी पत्रकारिता विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. नंदा पारेकर, संजय घोडावत विद्यापीठ पत्रकारिता विभागाचे प्रमुख जयप्रकाश पाटील, डॉ. राजेंद्र भस्मे , तिटवे येथील शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2024
पुढारी

# शाश्वत विकासासाठी जागतिक बँक कटिबद्ध : डॉ. हकीम


कोल्हापूर : जागतिक बँक सामाजिक समावेशन आणि शाश्वत विकासासाठी कटिबद्ध असून, ती विकसनशील देशांना त्यासाठी पतपुरवठा करीत आहे, असे प्रतिपादन डॉ. रोक्सांनी हकीम यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्यावतीने 'शास्वत विकास आणि सामाजिक समावेशनाचे उपाय' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या विशेष व्याखानामध्ये त्या बोलत होत्या. प्रास्ताविक अविनाश भाले यांनी केले. यावेळी डॉ. नंदा पारेकर, डॉ. नितीन माळी, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. प्रल्हाद माने, कुमार कांबळे यांच्यासह विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2024
सकाळ

# मराठी वाढीसाठीचे कार्य कौतुकास्पद : प्रा. शिंदे

बेळगाव, ता. ११ : सीमाभागात वेगळ्या भाषिक प्रदेशात राहून आत्मीयतेने, निष्ठेने, जिव्हाळ्याने व मराठी साहित्याच्या प्रेमापोटी मराठी भाषा व संस्कृती वाढीसाठी तुमचे कार्य मोठे आहे. सीमाभागात ही वैभवशाली भाषा पुढील पिढीकडे दिली जात आहे. येथील मराठी भाषिकांना अनेक अडचणी भेडसावत आहेत, तरीही मराठी भाषेच्या वाढीसाठी तुमचे कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी काढले

बेळगुंदी येथे श्री रवळनाथ पंचक्रोशी साहित्य अकादमीच्यावतीने आयोजित १८ वे मराठी साहित्य संमेलन रविवारी (ता. ११) उत्साहात पार पडले. आचार्य अत्रे साहित्य नगरी मरगाई देवस्थान परिसरात हे संमेलन झाले. यावेळी संमेलनाध्यक्ष म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर नगरसेवक रवी साळुंखे, शिवाजी मंडोळकर, सिद्धार्थ भातकांडे, कविभूषण आनंदहरी, स्वागताध्यक्ष अर्जुन चौगुले आदी उपस्थित होते.




**बेळगुंदी :** संमेलनात बोलताना अध्यक्ष प्रा. रणधीर शिंदे.

प्रा. शिंदे म्हणाले, 'साहित्य संस्कृती माणसाला घडविते. सध्याचे मराठी लेखक चांगल्या पद्धतीने सद्यस्थिती मांडताना दिसत आहेत. भाषा समाजाच्या वाढीसाठी सकारात्मक गोष्टी करत राहते. भाषेच्या वाढीसाठी सतत काहीतरी करत राहणे आवश्यक आहे. साहित्य माणसाला जोडण्याचे काम करत असते. तसेच जगण्याचे भान देण्याचे काम साहित्य करत असते. हजार वर्षांपासून मराठी भाषा येथे कार्यरत आहे मराठी भाषा साहित्याच्या प्रेमापोटी अनेक साहित्य संमेलने बेळगाव परिसरात होतात. मराठी भाषा व संस्कृती वाढीसाठी हे महत्त्वपूर्ण योगदान आहे.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2024
पुढारी

# 'दूरशिक्षण' केंद्राच्या परीक्षा अर्ज प्रक्रियेचा आज शेवटचा दिवस

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्ज भरण्याचा सोमवारी (दि.१२) शेवटचा दिवस आहे. एम.ए.,एम.कॉम. भाग १ व २, बी.ए., बी.कॉम. [illegible] १, २ व ३ मधील जे विद्यार्थी सेमिस्टर १, ३ व ५ मध्ये उत्तीर्ण [illegible] आहेत. अशा विद्यार्थ्यांनी सेमिस्टर २, ४ व ६ चा परीक्षा फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही. जे विद्यार्थी सेमिस्टर १, ३ व ५ मध्ये अनुत्तीर्ण झाले आहेत. त्यांना अनुत्तीर्ण परीक्षा फॉर्म व संबंधित अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा फी भरावी लागणार आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म वेळेत भरावेत. ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही रिपीटरचा फॉर्म भरलेले नाहीत त्यांनी https:/// sukapps. unishivaji. ac. in/ stud- reg/#/ login या लिंकवर जाऊन भरावेत, असे आवाहन दूरशिक्षण विभागाचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2024
तरुण भारत

# श्रेया म्हापसेकर, ऋतिका धनगर यांना युवा संसद पुरस्कार

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची मूल्ये रुजावीत यासाठी केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने देशातील समुहस्तनावरील विजेत्या सहा विद्यापीठांमध्ये १६ व्या युवा संसदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा सहभाग होता. विद्यापीठातील ५५ विद्यार्थ्यांच्या संघाने या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. यापैकी ८ बक्षीसपात्र विद्याथ्यर्थ्यांमध्ये न्यू कॉलेजच्या श्रेया म्हापसेकर आणि ऋतिका धनगर या दोन विद्यार्थिनीचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कॉलेज प्रशासनाकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. युवा संसदेमध्ये प्रश्न तास, विशेषाधिकाराचा भंग, वैधानिक कामकाज, विधेयक सादर करणे इत्यादी संसदीय कार्यप्रणालीतील विषयासह स्वच्छ भारत, कृरी, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, नवीन शैक्षणिक धोरण, आर्थिक धोरण, संरक्षण आदी विषयावर अभ्यासपूर्ण चर्चा केली होती. केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाच्या परीक्षण करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील कमिटीची निर्मिती करण्यात आली होती. या समितीमध्ये राज्यसभेचे माजी खासदार ब्रतीन सेनगुप्ता, ए. बी. आचार्या, प्रो. एस. बी. देव्सरकार यांचा समावेश होता. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ युवा संसदेच्या संघाचा समूहस्तरावर प्रथम क्रमांक आला. या संघाला १६ फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली येथे बक्षिस वितरण होणार आहे. संसदीय कार्यमंत्रालयाचे राज्यमंत्री अर्जुनलाल मेघवाल यांच्या अध्यक्षतेखाली संसदेच्या आवारातील बालयोगी सभागृहामध्ये बक्षीस प्रदान करण्यात येणार आहे. या विद्यार्थिनींना प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एन. पाटील, युवा संसदेचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने, उपप्राचार्य डॉ. आर. डी. दमकले, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. मनीषा नायकवडी यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 FEB 2024
तरुण भारत

# विद्यापीठ महिला क्रिकेट संघ ऑल इंडिया स्पर्धेसाठी पात्र




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संघासोबत व्यवस्थापक प्रा. श्वेता परुळेकर व प्रशिक्षक प्रा. देवदत्त महात्मे.

- ऑल राऊंडर कर्णधार भक्ती मिरजकरची प्रशंसनीय खेळी
- ४ चौकार व १ षटकारासह ठोकल्या ३४ धावा

प्रतिनिधी
कोल्हापूर

रिवा (मध्यप्रदेश) येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने भरारी घेत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेचे गुरुवारी तिकीट काढले. सलग दुसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. कर्णधार व अष्टपैलू खेळाडू भक्ती मिरजकरने शानदार खेळी केली आहे.

दरम्यान, रिवा येथील आवधेश प्रतापसिंग विद्यापीठाच्या मैदानात पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेच्या पहिल्याच झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने बडोदा (गुजरात) येथील एनएसयू विद्यापीठाला ५ गडी राखून पराभूत केले. या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना एनएसयू विद्यापीठाला १७ षटकात सर्वबाद फक्त ६६ धावांच जमवल्या होत्या. गोलंदाजीत चमकलेल्या शिवाजी विद्यापीठ संघाची कर्णधार भक्ती



मिरजकर व अभिलाषा पाटीलने प्रत्येकी ५ बळी घेत एनएसयू विद्यापीठाचा संघ केवळ ६६ धावांवरच गुंडाळला. प्रत्युत्तदाखल खेळताना शिवाजी विद्यापीठाच्या संघाने १७ षटकात ५ गड्यांच्या मोबदल्यात ६८ धावा करुन सामना जिंकला. भक्ती मिरजकरने शिवाजी विद्यापीठ संघाला सामना जिंकून देण्यासाठी ४ चौकार व १ षटकाराच्या जोरावरने ३४ धावा ठोकल्या. क्रीशी ठक्करने ही भक्तीला चांगली साथ देत ११ धावा केल्या. विद्यापीठाच्या संघाला व्यवस्थापक प्रा. श्वेता परुळेकर (रोटे महाविद्यालय) व प्रशिक्षक प्रा. देवदत्त महात्मे (बापुजी साळुंखे महाविद्यालय, कराड) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.